नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २२ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# पाणीटंचाईचे मोठे संकट

## पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांकडून चिंता; कर्जमाफी योजनेत सुधारणा



मुंबई : (स. गांवकरी)

शेतकरी कर्जमाफी हा कायमचा उपाय नाही, पण परिस्थितीनुसार शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्यासाठी सक्षम करण्यासाठी असे निर्णय घ्यावे लागतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत शेतकऱ्यांना काही अडचणी असलीत तर त्यात सुधारणा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी येथे दिली. राज्यावर दुष्काळाचे संकट मोठे असून शेतकऱ्यांनी जुलैच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सक्रिय झाल्यावरच पेरण्या कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्या सोमवारपासून सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी कर्जमाफी योजनेत आवश्यकता वाटल्यास योग्य निर्णय घेण्याचे सांगत सुधारणा करण्याचे संकेत दिले. राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्यास पात्र करण्याठी सरकारने समिती नेमली होती. या समितीने शेतकऱ्यांसाठी विविध शिफारशी केल्या असून त्यानुसार ही ३६,५८५ कोटींची कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. त्यात फारशी अटी नसून बँकींग व्यवस्था अडचणीत येऊ नये म्हणून काही निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र ही कर्जमाफी बँकासाठी नसून शेतकऱ्यांसाठी असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले. केवळ १० टक्के शेतकरी दोन लाखाच्या कर्ज मर्यादेच्या पलिकडचे असून या योजनेत आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली मंत्रिगटाची समिती तयार करण्यात आली आहे. त्यामुळे कर्जाफी जशी पुढे जाईल, त्यात काही अडचणी आल्यास त्यात सुधारणा केल्या जातील असेही फडणवीस यांनी सांगितले. अल निनोमुळे राज्यावर यंदा दुष्काळाचे अभूतपूर्व संकट असून कोकणात येत्या २३ जूनपासून पाऊस सक्रीय होईल, तर राज्यभरात जुलैच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सक्रीय होण्याची अपेक्षा असून १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय आणि राज्य सरकारने सांगितल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरण्या करू नयेत, असे आवाहनही फडणवीस यांनी केले. पाऊस खूप लांबला असून जूनचा विचार केल्यास सरासरीच्या ८० टक्के कमी पाऊस झाला आहे. ही सर्वांसाठी चिंतेची बाब आहे. पाऊस लांबल्यास पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण होण्याचा धोका टाळण्यासाठी शेतीसाठी पाणी उपशावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, यामुळे शेतकरी नाराज होत असले तरी सरकारसमोर अन्य पर्याय नाही, असेही फडणवीस यांनी सांगितले.

### ‘१० विधेयके मांडणार’

अधिवेशनात महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देण्याच्या विधेयकासह १० विधेयक मांडण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. विरोधकांच्या चहापानावरील बहिष्काराची खिल्ली उडवत मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात राजकीय चर्चेला राजकीय, गंभीर चर्चेला गंभीरपणे उत्तरे देण्याची सरकारची तयारी असल्याचे स्पष्ट केले.

## थोडक्यात...

### हे पक्षातून फुटणे नव्हे, स्वतःला विकणे आहे

पुणे (स. गांवकरी) : ‘रस्ते झाले पाहिजेत, पूल झाले पाहिजेत; पण हे सगळं करण्यासाठी तुम्हाला फुटायचं आहे का? त्याला फुटणे नाही, तर विकणे असेच म्हणतात. निधीसाठी या सगळ्या गोष्टी कराव्या लागतात, तर मग लोकशाहीला टाळे ठोकूया,’ अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी रविवारी शिवसेनेतील (उद्धव ठाकरे) फूटीवरून केली. पुणे पत्रकार कट्ट्याच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. कोल्हे बोलत होते. कट्ट्याचे संयोजक नीरज जाधव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रा. योगेश बोराटे, संदीप नर्डीले या वेळी उपस्थित होते. डॉ. कोल्हे म्हणाले, ‘राज्याचे प्रश्न केंद्र पातळीवर मांडण्यासाठी प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व आवश्यक असते. आता प्रादेशिक पक्ष संपवण्याचा प्रयत्न होत आहे. देशात द्विपक्षीय राजकारण लादले जात आहे. अशा वेळी प्रत्येक प्रदेशाच्या अस्तित्वासाठी, त्या-त्या प्रदेशाचे हित जोपासण्यासाठी प्रादेशिक पक्ष टिकवण्याची गरज आहे.’

### “एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाणार”

पुणे (स. गांवकरी) : गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात ‘ऑपरेशन टायगर’ची मोठी चर्चा सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून हे ‘ऑपरेशन टायगर’ राबवलं जात असल्याचं सांगितलं जातं. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ खासदार फुटल्याची चर्चा आहे. मात्र, या सहा खासदारांमध्ये धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा देखील समावेश असल्याने त्यांच्या बंडखोरीची मोठी चर्चा होत आहे. यातच दोन दिवसांत आपण कार्यकर्त्यांशी बोलून भूमिका जाहीर करणार असल्याचं ओमराजे निंबाळकर यांनी सांगितलं होतं. यानंतर आज ओमराजे निंबाळकर यांनी मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर अखेर मोठी घोषणा केली आहे. “आपण एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाणार असून यापुढे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करणार आहोत”, अशी घोषणा खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे.

### महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा

पुणे (स. गांवकरी) : राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. त्यानंतर महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. त्यानंतर महायुतीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिलं. तसेच राज्यातील विविध विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं. तसेच या पावसाळी अधिवेशनात महिलांसाठी एक महत्वाचं विधेयक विधीमंडळात मांडलं जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक अधिवेशनात मांडण्यात येणार असून या विधेयकानुसार आता महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा मिळणार आहे. “विरोधकांनी नेहमीप्रमाणे चहापानाच्या निमंत्रणावर जाहीर बहिष्कार टाकला. विरोधकांनी सहा पानाचं एक पत्र आम्हाला दिलेलं आहे. खरं तर विरोधक चर्चेला आले असते, तर काही गोष्टीवर चर्चा झाली असती. मात्र, त्यांनी तसं न करता आम्हाला एक पत्र दिलं.

# इसवलीत भक्ष्याच्या शोधात आलेला बिबट्या विहिरीत पडला

रत्नागिरी : (स. गांवकरी)

भक्ष्याच्या शोधार्थ गावाच्या परिसरात आलेला दीड वर्षांचा नर बिबट्या सार्वजनिक विहिरीत पडल्याची घटना लांजा तालुक्यातील इसवली पाथरवाडी येथे रविवारी घडली. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तत्काळ बचावकार्य हाती घेतले. स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या तासाभराच्या अथक प्रयत्नांनंतर बिबट्याची सुखरूप सुटका करण्यात आली. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी करून त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, इसवली गावातील ग्रामस्थ अक्षय गुरव यांनी रविवारी इसवली पाथरवाडी येथील सार्वजनिक विहिरीमध्ये बिबट्या पडल्याची माहिती लांजा वन विभागाला दिली. माहिती मिळताच वन विभागाने तातडीने हालचाली सुरू करत वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर लांजा वनपरीमंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर वन कर्मचाऱ्यांनी विहिरीची पाहणी करून बिबट्याच्या सुरक्षित सुटकेसाठी नियोजन केले. विहिरीत पडलेला बिबट्या घाबरलेल्या अवस्थेत असूनही शांतपणे बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. त्याची कोणतीही हानी होऊ नये यासाठी दोरीच्या सहाय्याने लोखंडी पिंजरा विहिरीत सोडण्यात आला. काही काळ प्रतीक्षा केल्यानंतर बिबट्या स्वतःहून पिंजऱ्यात शिरला. त्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी संयुक्तपणे पिंजरा वर ओढून बिबट्याला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढले. दुपारी एक वाजता संपूर्ण बचाव मोहीम यशस्वीरित्या पूर्ण झाली.

सुटका करण्यात आलेल्या बिबट्याची सहाय्यक आयुक्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुहास अनुसे यांनी वैद्यकीय तपासणी केली. तपासणीत संबंधित बिबट्या नर जातीचा असून त्याचे वय अंदाजे दीड वर्ष असल्याचे स्पष्ट झाले. तसेच तो पूर्णपणे निरोगी आणि सुस्थितीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे वन विभागाने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.



■ वन विभागाकडून सुखरूप सुटका


# सुवर्णघटिकेत प्रत्येक रुग्णावर मोफत उपचार बंधनकारक

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यातील प्रत्येक रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णाला त्याची आर्थिक क्षमता न पाहता सुवर्ण तासात मूलभूत जीवनरक्षक व तातडीची आपत्कालीन स्थिरीकरण सेवा-उपचार देणे राज्यातील सर्व रुग्णालयांना बंधनकारक करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांना पाच लाखापर्यंतचा दंड लावण्याचा तसेच त्यांची नोंदणी रद्द करण्याचाही महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गेल्या काही दशकांत वैद्यकीय तंत्रज्ञान, उपचार पद्धती आणि रुग्णांच्या हक्कांची वाढती अपेक्षा लक्षात घेऊन गेल्या ७५ वर्षांपासूनचा महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायदा निरसित करुन त्या ठिकाणी महाराष्ट्र नर्सिंग आस्थापना हा कठोर कायदा आणण्याचा निर्णय रविवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यानुसार कोणत्याही रुग्णाला पैसे नाहीत म्हणून उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर आता कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. राज्यात सन १९४९ पासून महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्याची अंमलबजावणी सुरू होती. मात्र या कायद्यातील त्रुटींचा फायदा घेऊन वैद्यकीय व्यवसायात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. अलिकडच्या काळात गुजरात, केरळ, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी जुने नर्सिंग होम कायदे रद्द केले असून त्याच धर्तीवर राज्यातही नवीन कायदा आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# बेस्टचा संप अखेर मागे; बैठकीत वेतनवाढीला मान्यता



मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप रविवारी रात्री उशिरा मागे घेण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याबरोबर कृती समितीची बैठक झाली. बैठकीत कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना तीन हजार, तर कंत्राटी कर्मचाऱ्यांना दोन हजार रुपयांच्या हंगामी वेतनवाढीची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली, तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांनी थकीत देणी या आर्थिक वर्षात अदा करण्यात येणार असून येत्या तीन वर्षांत पाच हजार बस बेस्टच्या ताफ्यात सामील करून घेण्यात येणार आहे.

तसेच येत्या १५ दिवसांत इतर विषयांबाबत चर्चा करण्यात येणार आहे. बेस्टचा संप मिटल्याने मुंबईकरांना दिलासा मिळणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सचिन अहिर, आमदार मुरजी पटेल, उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्टच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, तसेच बेस्ट कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

बेस्ट बस सेवा तात्काळ सुरू करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्यात यावी, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पुढील तीन वर्षांत ५००० नवीन बस स्वतःच्या मालकीच्या घेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नियोजित पद्धतीने करण्याचे निर्देश यावेळी दिले.

याशिवाय नवीन वेतन करार होईपर्यंत अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ३ हजार आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना २ हजार रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. बेस्ट प्रशासनाने तयार केलेला ‘कायापालट’ प्रस्ताव तातडीने शासनास सादर करून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेतली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

### प्रवाशांचे हाल

शुक्रवारी सुरू झालेल्या संपाचा रविवार तिसरा दिवस होता. तीन दिवस वेगवेगळ्या स्तरावर बेस्ट कृती समिती बरोबर चर्चा बैठका पार पडल्या. मात्र संपावर काहीच तोडगा निघाला नव्हता. रविवारी दिवसभर २२ बस आगारातून भाडेतत्त्वावरील व बेस्टच्या स्वमालकीची एकही बस रस्त्यावर धावली नव्हती. रविवार असल्याने मुंबईतील बहुतांश कार्यालयांना सुट्टी असल्याने दक्षिण मुंबईत येणाऱ्यांची संख्या कमी असते. ’मात्र रविवार सुट्टीचा दिवस पर्यटक मोठ्या प्रमाणावर गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉइंट, गिरगाव चौपाटी, मरीन ड्राइव्ह याठिकाणी फिरण्यासाठी येत असतात. मात्र बेस्ट बस रस्त्यावरून गायब असल्याने प्रवाशांना हाल सहन करावे लागले.

# बंदुकीचा धाक, अपहरण, खंडणीची धमकी

## आरोपी गणेश शिंदे व बाजीराव साठे पोलिसांच्या जाळ्यात

■ "तुमच्या मालकाला आम्हाला पैसे द्यायला सांग, नाहीतर आताच तुम्हाला जिवंत मारून टाकू" – कामगारांना धमकी देत चालत्या गाडीतून फेकल्याचा आरोप

दिंडोरी, नाशिक : (स. गांवकरी)



नाशिक-दिंडोरी मार्गावरील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या रस्ते बांधकाम प्रकल्पावर धाड टाकून कामगारांना मारहाण करणे, बंदुकीचा धाक दाखवून दोन कर्मचाऱ्यांचे अपहरण करणे, खंडणीची मागणी करणे आणि त्यांना चालत्या वाहनातून खाली फेकून देत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर आरोपांप्रकरणी दिंडोरी पोलिसांनी बाजीराव साठे आणि गणेश शिंदे (दोघेही रा. आडगाव, नाशिक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. न्यायालयाने पुढील तपासासाठी आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. याप्रकरणी एम/एस डी. जी. बेल्हेकर इन्फ्रा प्रा. लि. कंपनीचे प्रोजेक्ट इंजिनिअर उदयराज भारत विखे (वय २६) यांनी दिंडोरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, कंपनीने सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विकसित होणाऱ्या रस्त्यांपैकी नाशिक-दिंडोरी मार्गावरील ग्लोबल स्कूल ते अक्राळे फाटा दरम्यान सुमारे ९.२५ किलोमीटरच्या सिमेंट व डांबरीकरणाच्या रस्त्याचे काम हाती घेतले आहे. कामाचे व्यवस्थापन करण्यासाठी तळेगाव येथे तात्पुरते कार्यालय व मजुरांसाठी निवास व्यवस्था उभारण्यात आली आहे.

१७ जून २०२६ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास आरोपी बाजीराव साठे आणि गणेश शिंदे हे पांढऱ्या रंगाच्या विनानंबर वाहनातून कामाच्या ठिकाणी आल्याचा आरोप आहे. त्यांनी मशीनमध्ये झोपलेल्या मजुरांना जागे करून "तुम्ही रस्त्याचे काम करू नका" अशी दमदाटी करत मारहाण केली. त्यानंतर मजुरांच्या निवासस्थानी घुसून शिवीगाळ करत परिसर सोडून जाण्याची धमकी दिली.

फिर्यादीनुसार, आरोपींनी सिक्युरिटी गार्ड गोरेलाल रामदेव चौरसिया आणि ऑपरेटर रविशंकर द्विवेदी यांना बंदुकीचा धाक दाखवून जबरदस्तीने वाहनात बसवले. त्यानंतर त्यांचे अपहरण करून तळेगाव येथील पुलाजवळ नेण्यात आले.

आरोपींनी अपहृत कर्मचाऱ्यांना, "तुमच्या मालकाला आम्हाला पैसे द्यायला सांग, नाहीतर आताच तुम्हाला जिवंत मारून टाकू," अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर दोघांनाही चालत्या वाहनातून रस्त्यावर खाली ढकलून देत त्यांच्या जीवावर बेतणारा हल्ला करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १०९, ३०८(४), ३३३, ३५१(२), ३५१(३) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ३ आणि २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेनंतर पोलिसांनी प्रथम बाजीराव साठे यांना चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले. मात्र त्यांनी टाळाटाळ केल्याचे समोर आले. पोलिसांनी शिताफीने त्यांना ताब्यात घेत चौकशी सुरू केली.

दरम्यान, या प्रकरणातील दुसरा आरोपी गणेश शिंदे पोलिसांना सतत चकवा देत होता. चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश असूनही तो टाळाटाळ करत असल्याने पोलिसांनी त्याच्या हालचालींवर तांत्रिक पद्धतीने लक्ष ठेवले. टॉवर लोकेशनच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला. पोलिसांना आपला माग काढला गेल्याची चाहूल लागताच गणेश शिंदेने वाहनातून पळ काढल्याचे सांगितले जाते. आडगाव परिसरातून निघून तो घोटी टोलनाक्याच्या दिशेने वेगाने निघाला. मात्र पोलिसांनी घोटी टोलनाक्यावर बॅरिकेड्स उभारून त्याला अडवले आणि अखेर त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली.

### विनापरवाना शस्त्राचा शोध सुरू

या प्रकरणात विनापरवाना पिस्तूल वापरल्याचा आरोप असल्याने पोलिसांसमोर आता आरोपींकडून वापरण्यात आलेले शस्त्र हस्तगत करण्याचे मोठे आव्हान आहे. खंडणी, धमकी आणि जीवे मारण्याच्या प्रयत्नासाठी वापरण्यात आलेले शस्त्र नेमके कुठे लपवून ठेवण्यात आले आहे, याचा शोध तपास यंत्रणा घेत आहे. शस्त्र हस्तगत न झाल्यास पुढील काळात पोलीस कोठडीत वाढ मागितली जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### तपास सुरू; आणखी धागेदोरे शोधण्याचे प्रयत्न

सध्या पोलिसांकडून संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आरोपींच्या इतर संभाव्य हालचाली, आर्थिक व्यवहार, धमकी व खंडणीशी संबंधित बाबींची चौकशी केली जात आहे. या घटनेमुळे रस्ते बांधकाम प्रकल्पांवरील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, आरोपींविरुद्ध दाखल गुन्ह्यातील सर्व आरोप हे फिर्यादीत नमूद केलेल्या माहितीवर आधारित असून त्याबाबतचा अंतिम निष्कर्ष न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाहतूक नियंत्रणासाठी पोलिस कर्मचारी नेमण्याची भरत दळवी यांची मागणी

मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड बस आगार परिसरात वाढती प्रवासी गर्दी आणि वाहतुकीची समस्या लक्षात घेता रहदारी नियंत्रण व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी तात्काळ पोलिस कर्मचारी नेमावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी मुरबाड पोलीस प्रशासनाकडे केली आहे. सध्या कल्याणसह विविध मार्गांवरून येणाऱ्या बसमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होत असून, दोन दरवाजे असलेल्या बसमध्ये प्रवासी पुढील व मागील दोन्ही दरवाज्यांतून चढण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे उतरणाऱ्या प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा वाद निर्माण होत असल्याचे दळवी यांनी पत्रात नमूद केले आहे. याशिवाय बस आगार परिसरात काही व्यसनाधीन व्यक्तींची वर्दळ असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच पार्किंगची व्यवस्था नसतानाही काही वाहने बस आगाराच्या आवारात उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडी वाढत आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर कोणताही अपघात किंवा अनुचित प्रकार घडू नये, प्रवाशांनी शिस्तबद्ध रांगेत बसमध्ये चढावे-उतरावे आणि बस आगारातील व्यवस्थापन सुरळीत राहावे यासाठी किमान दोन पोलिस कर्मचाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करावी, अशी मागणी भरत दळवी यांनी मुरबाड पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनातून केली आहे.

### जामखेडमध्ये श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन




जामखेड (स. गांवकरी) : श्री शिव राज्याभिषेक उत्सव समिती, जामखेड तालुक्याच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही हिंदवी स्वराज्य दिनानिमित्त भव्य श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवशके ३५३ प्रारंभानिमित्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीपासून मंगळवार दि. २३ जून ते शनिवार दि. २७ जून २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली. सोहळ्याची सुरुवात मंगळवार दि. २३ जून रोजी रात्री ७ ते ९ या वेळेत विनोद सम्राट ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (नेवासा) यांच्या कीर्तनाने होणार आहे. बुधवार दि. २४ जून रोजी भागवताचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा (केज) यांचे कीर्तन होईल. गुरुवार दि. २५ जून रोजी रात्री ७ ते ९ या वेळेत गौरव महाराष्ट्राचा शिवशाहीर पृथ्वीराज माळी (सांगली) यांचा शिवचरित्रावर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार दि. २६ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून रात्री ७ ते ९ या वेळेत कीर्तन चंद्रिका ह.भ.प. रोहिणीताई महाराज परांजपे-माने (पुणे) यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार दि. २७ जून रोजी पहाटे ५ वाजता सप्तनद्या, गडकोट, किल्ले व तीर्थक्षेत्र येथून आणलेल्या पवित्र जलाने शिवछत्रपतींच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात येणार आहे. तसेच दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी जामखेड शहरातून भव्य शिवराज्याभिषेक मिरवणूक काढण्यात येणार आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मार्ग, तहसील कार्यालयासमोर या सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री शिव राज्याभिषेक उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्या निकेतन डी. फार्मसी कॉलेजच्या उज्वल निकालाची परंपरा कायम




बोटा (स. गांवकरी) : बोटा (ता. संगमनेर) येथील विद्या निकेतन ग्लोबल इन्स्टिट्यूट संचलित विद्या निकेतन औषध निर्माणशास्त्र (डी. फार्मसी) अभासक्रमाच्या महाराष्ट्र तंत्रशिक्षणमंडळाने उन्हाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला असून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादीत केले. द्वितीय वर्ष डी.फार्मसी कु. टेकवडे ऐश्वर्या नवनाथ (७७.७३%) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, कु गांजवे वैष्णवी बाळासाहेब (८४.९१%), गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु. महाजन सुचिता त्र्यंबक (७२.७३%) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला, प्रथम वर्षामध्ये कु. डोमाले रुपाली पंढरीनाथ (७६.७०%) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, कु. मून वृषाली रुपेश (७४%), गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु. घुले रोहन सुनील (७१.३०%) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांनी दिली. तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे उपाध्यक्ष रामदास पोखरकर सर व सीईओ डॉ. विद्युलता पाटील मॅडम तसेच कॅम्पस डायरेक्टर श्री. दीपक रहाणे सर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/ १३/२५ दिनांक: १३.५.२०२६.

श्री महमंद जफर रसुलभाई शेख रा जुन्नर ता जुन्नर जि पुणे...**अपिलार्थी**

**विरुद्ध.........** निबंधक जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी .....**प्रतिवादी**
नगर परिषद जुन्नर

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्री महमंद जफर रसुलभाई शेख रा जुन्नर ता जुन्नर जि पुणे यांनी आई नामे कै. लैलाबी रसुलभाई शेख यांचा मृत्यू दिनांक २/६/२०२२ रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा मृत्यू नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ १३/२५ दिनांक ८.१.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर - आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

# प्रेमप्रकरणातून झालेल्या निर्घृण हत्येने नरुळ शोकसागरात

## माजी मंत्री डॉ. भारतीताई पवार यांची पीडित कुटुंबाला सांत्वन भेट

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील नरुळ येथे प्रेमप्रकरणाच्या पार्श्वभूमीवर दिवसा ढवळ्या कनेरवाडी येथे कांदा चाळीत घुसून युवक सचिन याची करण्यात आलेली निर्घृण हत्या संपूर्ण तालुक्याला हादरवून गेला आहे. या दुर्दैवी घटनेनंतर माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा भाजप नेत्या डॉ. भारतीताई पवार यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले तसेच घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली.



सचिनच्या घरी पोहोचताच डॉ. पवार यांच्यासमोर दुःखाचा डोंगर कोसळलेले कुटुंब पाहायला मिळाले. घरातील वातावरण अत्यंत हृदयद्रावक होते. सुन्न झालेल्या घरात फक्त आक्रोश आणि किंकाळ्याच ऐकू येत होत्या. मुलाचा फोटो पाहून आई-वडील, नातेवाईक आणि मित्रांच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटला होता. विशेष म्हणजे मयत सचिनच्या आईची प्रकृतीही गंभीर असल्याची माहिती यावेळी समोर आली. यावेळी बोलताना डॉ. भारतीताई पवार म्हणाल्या, "ही अतिशय गंभीर आणि दुर्दैवी घटना आहे. आपल्या कळवण तालुक्यात यापूर्वी अशा प्रकारची घटना कधीही घडली नव्हती. एका तरुणाचा अशा पद्धतीने जीव जाणे अत्यंत वेदनादायी आहे. दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे." घटनेची गंभीरता लक्षात घेऊन डॉ. पवार यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली तसेच परिस्थितीची संपूर्ण माहिती नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या निदर्शनास आणून दिली. कायद्यावरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी निष्पक्ष व सखोल तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, कळवण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खगेद्र टेंभेकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, "या गुन्ह्यात जो कोणी दोषी आढळेल त्याला कोणतीही दया दाखवली जाणार नाही. कायद्याच्या चौकटीत राहून कठोर कारवाई केली जाईल. आतापर्यंत तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून इतर संबंधितांचीही चौकशी सुरू आहे. कोणालाही सोडले जाणार नाही."

तपास अधिकारी उपपोलीस निरीक्षक जगदीश बोरसे यांनीही पीडित कुटुंबीयांना आणि फिर्यादींना तपासाची माहिती देत प्रत्येक बाजूचा बारकाईने तपास सुरू असल्याचे सांगितले. यावेळी सचिनच्या नातेवाईकांनी आणि मित्रपरिवाराने पोलीस प्रशासनाकडे सखोल तपास करून कठोर कारवाईची मागणी केली. तसेच या प्रकरणात संबंधित मुलीसह तिचे आई-वडील, चुलता आणि काकू यांचीही भूमिका तपासून त्यांच्यावरही गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीवर पोलीस निरीक्षकांनी कायदेशीर प्रक्रियेनुसार सर्व बाबींची चौकशी करून न्याय देण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

नरुळ गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते. संपूर्ण गाव शोकमग्न वातावरणात असून युवकाच्या अकाली मृत्यूमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

यावेळी भाजप नेत्या डॉ. भारतीताई पवार, भाजप तालुकाध्यक्ष दादाजी मोरे, भरत गायकवाड, हेमंत बंगाळ, डॉ मैने ,काशीनाथ गावित यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एका प्रेमसंबंधाचा शेवट इतक्या रक्तरंजित पद्धतीने होणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून समाजासाठी गंभीर इशारा आहे. मतभेद, कौटुंबिक दबाव किंवा सामाजिक प्रतिष्ठेच्या नावाखाली हिंसेचा मार्ग स्वीकारला जात असेल तर ही समाजव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. एका तरुणाचा जीव गेला, एक कुटुंब उद्ध्वस्त झाले आणि संपूर्ण गाव दुःखाच्या छायेत गेले.

## उद्धव भारती यांना ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात पीएच.डी. प्रदान

राजुरी : (स. गांवकरी)

सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी राजुरी येथे ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणारे उद्धव भारती यांना निर्वाण युनिव्हर्सिटी जयपुर या विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयांमध्ये पी.एच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी निर्वाण युनिव्हर्सिटी मधील ग्रंथालय विभाग प्रमुख असोसिएट प्रो. डॉ. रीना आनंद यांच्या मौल्यवान मार्गदर्शनाखाली "युज ऑफ डिजिटल इन्फॉर्मेशन रिसोर्सेस अमंग द युजर्स ऑफ अग्रिकल्चरल युनिव्हर्सिटीज ऑफ महाराष्ट्र अ स्टडी" या विषयावर शोधप्रबंध सादर केला. बाह्य परीक्षक म्हणून डॉ. विजय लक्ष्मी चौधरी डॉ. सतीश पदमे यांनी काम पाहिले. तदप्रसंगी प्रेसिडेंट (व्हॉइस चान्सलर )प्रो.(डॉ.) एस. एल. गोदरा, रिसर्च डायरेक्टर डॉ. राजेश कुमार कासवान, डॉ. आलोक कुमार सिंग, डॉ. रीना आनंद (डीन स्कूल ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स)



तसेच तसेच विद्यापीठातील अनेक संशोधक मान्यवर उपस्थित होते. या संशोधन कार्याच्या अथक परिश्रमामध्ये मला साथ देणारी माझी पत्नी उषा भारती माझ्या दोन्ही कन्या अनन्या भारती आणि आराध्या भारती तसेच माझ्या महाविद्यालयाचे चेअरमन व्हि. आर. दिवाकरन, खजिनदार सचिन चव्हाण सर आणि प्रिन्सिपल पी बलाराम सर आणि मित्रामध्ये डॉ. शंकर धांडे, डॉ.गणेश सागरे, प्रा. तेजस नलावडे, प्रा. वैभव नांगरे, प्रा. विशाल औटी यांनी मोलाची साथ दिली म्हणूनच मी माझे संशोधन पूर्ण करू शकलो त्याबद्दल मी या सर्वाविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

## बिबट्याचा महिलेवर हल्ला; वनविभागाची तातडीने कारवाई!

कोतूळ-सुनिल आरोटे: (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील वाघापूर येथे शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास शेतात चारा आणण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वाघापूर येथील शेतकरी कुटुंबातील सौ. अनिता सचिन रकटे या घराशेजारील शेतात गाय व शेळ्यांसाठी चारा आणण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक झडप घातली. बिबट्याने त्यांना खाली पाडून उजव्या हाताचा लचका तोडला, तर डाव्या हातावर नखांचे ओरखडे उमटले. तसेच डोक्यावरही पंजाने वार केल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.



जखमी अवस्थेत असलेल्या अनिता रकटे यांनी मोठ्याने आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकून सासूबाई विमल रकटे घराबाहेर धावत आल्या. त्यांनीही आरडाओरडा केल्याने सासरे लक्ष्मण रकटे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी हातातील काठी आपटत मोठ्याने आवाज करून बिबट्याला पळवून लावत सुनेची सुटका केली.

घटनेची माहिती मिळताच सोपान रकटे, संतोष औटी, महेंद्र रघुनाथ बराते, देवराम शेठ लांडे, महेंद्र बराते आणि संजय औटी यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी महिलेचा मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने महेंद्र बराते यांनी कोणताही विलंब न करता स्वतःच्या वाहनातून त्यांना कोतूळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना संगमनेर येथील कुंटे रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वनरक्षक दिपक गवारी व वन कर्मचारी स्वप्नाली शेळके यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. जखमी महिलेच्या उपचाराची जबाबदारी स्वीकारत दिपक गवारी यांनी स्वतः रुग्णासोबत संगमनेरला जाऊन उपचाराची व्यवस्था केली. तसेच परिसरात बिबट्याचा वावर लक्षात घेऊन तात्काळ पिंजरे लावण्याच्या सूचना दिल्या. वनविभागाने घटनास्थळी दोन ते तीन पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी मोहीम सुरू केली आहे.

या घटनेमुळे वाघापूर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी शेतात जाताना सतर्कता बाळगावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

## समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हेचा एम.एच.टी.-सीईटी २०२६ मध्ये यश

बेल्हे : (स. गांवकरी)

ज्ञान, गुणवत्ता आणि यश यांचा त्रिवेणी संगम असलेल्या समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे (बांगरवाडी) येथील विद्यार्थ्यांनी एम.एच.टी.-सीईटी २०२६ परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करून संस्थेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.



पीसीबी गटामध्ये विद्यार्थिनी कु.रिद्धी थिटे हिने ९७.५४ पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशाने समर्थच्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा उंचावला आहे. याशिवाय वैष्णवी येवले (९५.८०), दिव्या औटी (९३.५५), आयुष वाघुले (९३.१७), ईश्वरी दाते (९२.३५), श्रुती शिंदे (९२.०७) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. तब्बल अनेक विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा अधिक पर्सेंटाईल मिळवत यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखल्याची माहिती प्राचार्या वैशालीताई आहेर यांनी दिली.

पीसीएम गटामध्ये दिव्या औटी हिने ९५.०९ पर्सेंटाईल मिळवत विशेष कामगिरीची नोंद केली. तसेच दत्तात्रय पानमंद (८९.५१), आयुष वाघुले (८७.९६), दीपक पारधी (८७.४०), गणेश परंडवाल (८५.८१), ज्ञानेश्वरी जाधव (८५.८१) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविली.

याचबरोबर समर्थ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनीही यशाचा नवा अध्याय लिहिला. समर्थ विवेक शेळके यांनी बीबीए-सीईटीमध्ये ९६.८१ टक्के, तर कु. श्वेता संदीप मटाले यांनी पीसीबी गटात ९२.६० टक्के गुण मिळवून संस्थेचा नावलौकिक अधिक उंचावला. तसेच श्वेता बांगार (८५.५०), सार्थक गाडगे (८३.८९) आणि स्नेहा रोकडे (७९.५४) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केल्याची माहिती समर्थ गुरुकुल ची प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची अथक मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि संस्थेचे दूरदृष्टीपूर्ण शैक्षणिक धोरण यांचा मोठा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, मा. जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर तसेच संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

## संविधान भवनच्या एक एकर जागेवर संविधान भवन

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला तथा औद्योगिक शाळा ( नार्थकोट ) सोलापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीच्या वतीने वेळोवेळी केलेल्या अथक पाठपुराव्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या मागील सन 2022 साली उद्याणासाठी अधिकृतपणे मंजुर झालेल्या एक एकर जागेवर "संविधान भवन" बांधण्यासाठी शासन स्तरावरून अपूर्ण राहिलेली मान्यतेची प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, विभागाचे कॅबिनेट मंत्री मान.मंगलप्रभात लोढा साहेब यांनी सोलापुरातील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज दुपारी झालेल्या



भरगच्च अशा जाहीर पत्रकार परिषद जाहीर करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीच्या वतीने मंत्री मंगल प्रभात लोढा यांना आज निवेदन देत असताना यातील शिष्ठमंडळाला वरील आश्वासन दिले आहे. यावेळी सोलापूर शहर मध्य मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे एक धडाकेबाज कर्तृत्ववान युवाप्रिय तसेच लोकप्रिय युवा तडफदार आमदार मान.देवेंद्रजी कोठे साहेब यांनी ही "संविधान भवन" बांधण्यासाठी लागणारा आर्थिक निधी महाराष्ट्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याची ग्वाही या पत्रकार परिषदेत दिली.

# पालखी सोहळ्यास बैलजोड निवड समिती बैलजोड सेवा देणार

## समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, नंदकुमार कुऱ्हाडे पाटील यांची घोषणा

आळंदी : (स. गांवकरी)

आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास यावर्षी बैलजोड निवड समिती बैलजोड सेवा देणार असल्याची माहिती समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, माजी उपनगराध्यक्ष तथा समिती सदस्य नंदकुमार कुऱ्हाडे पाटील यांनी दिली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाला बैलजोडी सेवा देण्यासाठी आळंदीकर ग्रामस्थ बैलजोडी निवड समितीने या वर्षी जबाबदारी स्वीकारली असून तशी है देखील दिली आहे. सन १९८२ पासून बैल जोड समिती श्रींचे पालखी रथाला बैलजोडी देण्यासाठी ग्रामस्थां मधून नावे मागवून सेवा पुरवली जाते. या वर्षी रानवडे यांचे कडे सेवा देण्याचे रोटेशन होते. मात्र रानवडे कुटुंबात सेवा देण्यावर एकमत न झाल्याने तसेच या सेवेसाठी आपला विचार प्राधान्याने करावा अशी आग्रही मागणी उमेश रानवडे यांनी केल्यामुळे या मागणी साठी त्यांनी लाक्षणिक उपोषण देखील केले. या वेळी सन्माननीय तोडगा काढायची ग्वाही समितीने दिली होती. मात्र उमेश रानवडे यांना तोडगा मान्य न झाल्याने तसेच आपला हट्ट कायम ठेवून न्यायालयात जाणार असल्याचे सांगत तोडगा मान्य नसल्याचे सांगितले. यावर समितीने या वर्षी सर्वमान्य निर्णय रानवडे परिवारात झाला नाही. अखेर समितीने या



प्रकरणी आळंदी पोलिसांत तक्रार देत समितिने स्वता बैलजोडी देण्याचा निर्णय घेऊन देवस्थान ला पत्र देऊन कळविले असल्याचे कुऱ्हाडे पाटील यांनी सांगितले. या वर्षी समितीकडे आलेल्या अर्जातून हर्षवर्धन रानवडे, तुळशीराम रानवडे यांच्या नावाची घोषणा बैलजोड सेवा देण्यासाठी समितीने केली होती. यावर उमेश रानवडे यांनी हरकत घेत आपली बैलजोडी लावण्याचा हट्ट धरला. तत्पूर्वी तोडगा मान्य करून नंतर न्यायालयात जाणार असल्याची त्यांनी भूमिका घेतली. मात्र समिती ने अर्जदार यांचे अर्जा प्रमाणे स्थळ पाहणी केली असता बैल जोडीचा गोठा व बैलजोड उमेश रानवडे यांचे कडे नसल्याचे तीन सदस्य समिती चे स्थळ पाहणी उघड झाले.

यामुळे समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी पोलिसांकडे तक्रार देत केली आहे. रानवडे परिवारात अंतर्गत वाद असल्याने निर्णय समितीने जाहीर केला. या वर्षी नाहक वाद निर्माण करून समितीचे कामकाजात हस्तक्षेप करण्यात आला. मात्र समिती चे वेगळे अस्तित्व आहे. या वर्षी तीन सदस्य समिती उपोषणा वेळी जाहीर केली. त्या ही समितीने अहवाल देत कामकाज केले. मात्र पूर्ण सहमती न मिळाल्याने अखेर स्वतः बैलजोड निवड समिती या वर्षी बैलजोड सेवा देणार असल्याचे समितीने जाहीर करीत निर्णय घेतला. या प्रकरणी पोलिस प्रशासनावर देखील ताण निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप समितीने केला.

स्थानिक राजकीय हेतूने प्रेरित व्यक्ती, संस्था, पदाधिकारी यांनी वाद निर्माण केला असल्याचे आरोप ही समितीने केले आहे. ते उघड झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी दिलेल्या तक्रारीत करण्यात आली आहे.

# सरसकट कर्जमाफीसाठी 23 जूनला पारनेर तहसीलवर जनआक्रोश मोर्चा

## खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक : शेतकरी, सामाजिक संघटना व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा सहभाग

पारनेर : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसह विविध प्रलंबित प्रश्नांसाठी येत्या २३ जून रोजी पारनेर तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



बैठकीस तालुक्यातील शेतकरी, अखिल भारतीय काँग्रेस पक्ष, शिवसेना ( उबाठा ) , भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, संभाजी ब्रिगेड, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन या पक्ष तसेच सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी राज्यातील शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करीत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळत नसलेला हमीभाव आणि वाढती कर्जबाजारीपणाची समस्या यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. त्यामुळे शासनाने कोणत्याही अटी-शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली.

खासदार नीलेश लंके यांनी यावेळी मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण कायम त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे स्पष्ट केले. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा जनआक्रोश अधिक तीव्र होईल, असा इशाराही त्यांनी दिला.




**अहिल्यानगर** : श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पाई पालखी सोहळा 2026 साठी ची संपूर्ण नियोजन संयोजन आढावा बैठक संपन्न झाली त्या प्रसंगी शासनाकडून यावर्षी सर्वोत्तम सोयी सुविधा व व्यवस्था वारकऱ्यांकरता दिल्यांकरता मिळणार आहे. संस्थांचे अध्यक्ष ह भ प राहुल महाराज साळुंके यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले. पालखी सोहळ्यासाठी मंत्री श्री गिरीश भाऊ महाजन , सन्माननीय आयुक्त श्री आयुष प्रसाद, मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, नाशिक शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, ग्रामीण पोलीस आयुक्त श्री स्वामी, मोडल अधिकारी प्रतिभा संगमनेर, तसेच विविध विभागाचे सर्व अधिकारी यांच्या सहकार्याने यावर्षी वारकरण करतात विविध सोयी सुविधा व्यवस्था देण्यात येणार आहेत. निर्मल वारी, स्वच्छ वारी, निर्भय वारी, आनंदी उत्साही वारी, यशस्वी वारीसाठी प्रशासन व विश्वस्त मंडळ सज्ज झाले आहे.

## थोडक्यात बातम्या...

### माळी वधू वर सूचक कार्यालयात रविवारी वेबसाईटचे उद्घाटन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : माळीवाडा येथे पेमराज गुगळे हायस्कूल मध्ये सकल माळी समाज ट्रस्ट संचालित माळी वधू वर सूचक कार्यालयात वेबसाईटचे उद्घाटन दि.२१ जून रविवारी सकाळी ११ वाजता उपमहापौर मा.धनंजय जाधव यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात उत्कर्ष कॉम्प्युटरचे डायरेक्टर नितीन अनारसे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.यावेळी प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ नगरसेवक मा.बाळासाहेब बोराटे,इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ.अनिल आठरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी सकल माळी समाज बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन माळी वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाचे अध्यक्ष राजाराम चिपाडे, उपाध्यक्ष संजय ताजणे, सचिव सुदाम बोरुडे,खजिनदार रमेश चिपाडे आदींनी केले आहे.

### डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजचा १०० टक्के निकाल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नारायणडोह येथील डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा निकाल 100 टक्के लागला असून उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे उन्हाळी पदविका परीक्षाचा निकाल जाहीर झाला आहे. डॉ.पाऊल बुधे तंत्रनिकेतनने समृद्ध भारतासाठी नवीन तरुण अभियंते घडवित आहेत.अशी प्रतिक्रिया प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाने यंदाही 100 टक्के निकालाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे,पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. अंतिम वर्ष मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागात रेहान शेख 82% प्रथम श्रेयश कल्याणम 81% द्वितीय तर श्रेयस जाधव 79 % गुण मिळवून तृतीय आला आहे. अंतिम वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागात प्रज्योत धांगडे 83% प्रथम, तुषारी वाघ 82 % द्वितीय, तर पवन वाघ 80 % गुण मिळवून तृतीय आला आहे. सिव्हिल अभियांत्रिकी विभागात विश्वजीत पवार 85 % प्रथम, सुप्रिया भाबड 74% टक्के द्वितीय, विजय खळदकर 66% तृतीय असे यश मिळवले आहे. संगणक अभियांत्रिकी विभागात चार विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या सर्वांना 91% गुण मिळाले आहेत. यामध्ये नीलम सय्यद, दिव्या अंकम, कृष्णा रंगाटे,आदित्य राऊत या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. द्वितीय, प्रथम अशा सर्व विभागातील विद्यार्थी चांगले गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. तर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विभागात देखील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे.या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, उपप्राचार्य राजेंद्र देशपांडे, प्राध्यापक, शिक्षक वृंद आदींनी अभिनंदन केले आहे.

### आदर्श जि.प. प्राथमिक शाळेला संगणकाची सप्रेम भेट



वडगाव आनंद (स. गांवकरी) : समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत आणि आपल्या वडिलांच्या स्मृतीला अभिवादन करत, कैलासवासी ह.भ.प. प्रभाकर महाराज चौगुले यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव तुळशीदास प्रभाकर चौगुले व सुनबाई शुभांगी तुळशीदास चौगुले यांनी आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडगाव आनंद या शाळेला एक संगणक सप्रेम भेट देऊन सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला आहे. वडिलांच्या दशक्रिया कार्यक्रमात शाळेला संगणक भेट देण्याचे आश्वासन दिल्यानंतर चौगुले परिवाराने दिलेला शब्द पूर्ण केल्याने गावभर त्यांच्या कार्याचे कौतुक होत असताना ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सर्वच ग्रामस्थांनी या भेट उपचाराचे कौतुक केले आहे. आधुनिक संगणकीय युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने ही भेट देण्यात आली. या संगणक भेटीचे स्वागत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक तसेच ग्रामस्थांनी मोठ्या आनंदाने केले. संगणक प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला.

### २० जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिर



किनवट (स. गांवकरी) : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त किनवट येथील दिवाणी न्यायालयात २० जून २०२६ रोजी सकाळी ६ वाजता विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुका विधी सेवा समिती, किनवट तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, किनवट यांच्या वतीने याबाबतचे पत्र अभिवक्ता संघ, न्यायालय किनवट यांना पाठविण्यात आले आहे. २१ जून रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने योग दिनाचा कार्यक्रम २० जून रोजी आयोजित करण्यात येत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या योग शिबिरात न्यायालयीन कर्मचारी, वकील तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योगाचे महत्त्व जाणून घ्यावे व आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर किनवट यांनी केले आहे. योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे आरोग्याबाबत जनजागृती होण्यास मदत होणार असून, परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# ४९ विद्यार्थिनींची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील मा. श्री. बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्टच्या परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयाने आणखी एक यशस्वी टप्पा गाठला आहे. महाविद्यालयातील एकूण 49 विद्यार्थिनींची नामांकित औषधनिर्माण कंपन्यांमध्ये निवड झाली असून, ही संस्था व विद्यार्थिनींसाठी अभिमानास्पद आणि ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे. महाविद्यालयातील 27 विद्यार्थिनींची एजिओ फार्मा, भोसरी (पुणे) येथे तर 22 विद्यार्थिनींची एमक्योर फार्मास्युटिकल्स, पुणे या नामांकित कंपनीत मुलाखतीद्वारे निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालयाची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा आणि यशोगाथा कायम राखली गेली आहे.




महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थिनींचे हे यश संस्थेच्या दर्जेदार शिक्षणपद्धतीचे तसेच त्यांच्या मेहनतीचे द्योतक मानले जात आहे.

परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, दर्जेदार शिक्षण आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थी यशाच्या शिखरावर पोहोचू शकतात. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते हे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, सुसज्ज क्रीडांगण आणि विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. या यशस्वी विद्यार्थिनींचे प्राचार्य डॉ. सुनिल निर्मळ, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. सोनल सोलंकी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय निवडीमुळे पालकांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ग्रामपंचायतीकडून डिजिटल सुवर्णसंधी

पाथर्डी : (स. गांवकरी)

बदलत्या काळासोबत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आघाडीवर राहावे, या उद्देशाने येथील स्थानिक ग्रामपंचायतीने एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केदार वस्ती येथील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक इंटरॲक्टिव्ह डिजिटल बोर्ड'भेट देण्यात आला आहे. या डिजिटल बोर्डमुळे आता केदार वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचा शिक्षण प्रवास अधिक रंजक, सोपा आणि हायटेक होणार आहे. पंचायत समिती पाथर्डी चे अधिक्षक शालेय पोषण आहार श्री रामनाथ कराड व सैदापूर सरपंच विष्णू केदार हतराळ सरपंच दादासाहेब शिवलकर, ग्रामविकास अधिकारी श्री संदीप ढाकणे,पदाधिकारी यांच्या हस्ते

■ विद्यार्थ्यांसाठी दिला इंटरॲक्टिव्ह बोर्ड'!

नुकत्याच पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात या इंटरॲक्टिव्ह बोर्डचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी गावातील सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. नव्या डिजिटल बोर्डवर जेव्हा पहिल्यांदा शिक्षकांनी चित्रफिती आणि शैक्षणिक खेळ सुरू केले, तेव्हा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि कुतूहल पाहण्यासारखे होते.या आधुनिक बोर्डमुळे शाळेतील शिक्षण पद्धतीत मोठा बदल होणार आहे. शाळेचे मुख्याध्यापकांनी ग्रामपंचायतीचे आभार मानत या बोर्डचे खालील फायदे सांगितले.

# वाचनाने संस्कारक्षम समाज घडतो : डॉ. राजधर टेमकर



पाथर्डी : (स. गांवकरी)

दादापाटील राजळे महाविद्यालयात पी. एन. पन्नीकर यांच्या स्मृतिदिना निमित्त राष्ट्रीय वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी सांगितले की , संस्कारक्षम समाज निर्मितीसाठी ग्रंथ वाचन महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने किमान रोज एक तास तरी वाचन केले पाहिजे. वाचनामुळे ज्ञानवृद्धी होते. वर्तमानपत्र वाचल्याने जगातील घडामोडींची माहिती होते तर ग्रंथ वाचनाने ज्ञानवृद्धी होते. तसेच स्मरणशक्ती व एकाग्रता वाढण्यासाठी वाचनाचा उपयोग होत असतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ.राजकुमार घुले यांनी केले तर आभार कु . संगम वांढेकर यांनी मानले. कार्यक्रमास विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एन. नेहूल, डॉ. जे. टी. कानडे, डॉ. के . जी. गायकवाड, डॉ. निर्मला काकडे, डॉ. राजू घोलप, प्रा.अमोल धाडगे, प्रा. चंद्रकांत पानसरे, प्रा. प्रदिप धनवडे, प्रा. शरद मिसाळ , प्रा. महेश गोरे आदी शिक्षक विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# बिलोली, परिसरात 'तोतया' पत्रकारांचा "उच्छाद"


## महसूल भरणाऱ्या व्यवसायधारकांना नाहक त्रास

### पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करण्याची मागणी

बिलोली : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासनाला रीतसर महसूल आणि रॉयल्टी भरून कायदेशीररित्या परवाना काढून व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना व वाहतूकदारांना नायगाव, नरसी आणि देगलूर परिसरातील काही बोगस, तोतया पत्रकारांनी संबंधित संपादकानी दिलेले कार्यक्षत्र सोडून अमुक -तमुक पेपरच्या नावाने तहसीलदाचे नाव

सांगून वेठीस धरल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. "हप्ता द्या, अन्यथा अवैध उत्खननाची खोटी तक्रार करून उद्योग बंद पाडू," अशी धमकी देत या तोतयांनी पत्रकारांनी परिसरात उच्छाद मांडला असून व्यवसायधारकांनी आता पोलीस प्रशासन व जिल्हा माहिती प्रसारण अधिकाऱ्याकडे घेतली धाव.



मिळालेल्या माहितीनुसार, बिलोली तालुक्यात अनेक व्यावसायिक शासनाची रीतसर परवानगी घेऊन दगड, मुरूम आणि मातीचे उत्खनन व वाहतूक करत आहेत. नियमानुसार रॉयल्टी भरूनही, अधिकार नसताना नरसी नायगाव, देगलूर तालुक्यातील काही स्वयंघोषित आणि सोशल व प्रिंटमीडिया बोगस पत्रकार थेट खदानीच्या ठिकाणी जाऊन बेकायदेशीरपणे व्हिडिओ शुटिंग करतात. एवढ्यावरच न थांबता, रस्त्यात गाड्या अडवून "तुझे उत्खनन अवैध आहे, आम्ही तहसीलदार, एसडीएमला सांगून तुझ्यावर कारवाई करायला लावतो," अशी भीती दाखवली जाते. ही कारवाई टाळायची असेल तर ठराविक 'हप्ता' द्यावा लागेल, अशी उघड मागणी या तोतया पत्रकाराकडून केली जात आहे. शासनाचा महसूल बुडवून नव्हे, तर तो प्रामाणिकपणे भरून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना या बोगस पत्रकारांमुळे मोठ्या आर्थिक नुकसानीला आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पत्रकारितेच्या पवित्र पेशाला कलंक लावत, स्वतःचे खिसे भरण्यासाठी या तोतयांनी हा धमकावण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. यामुळे प्रामाणिक व्यावसायिकांचे मनोधैर्य खचत असून, परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या गंभीर प्रकाराची दखल घेऊन, खऱ्या आणि प्रामाणिक पत्रकारांची प्रतिमा डागाळणाऱ्या या बोगस पत्रकारांची तात्काळ चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.आता या प्रकरणावर जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हा माहिती कार्यालय काय पावले उचलणार आणि या बोगस पत्रकारांच्या मुसक्या कधी आवळणार, याकडे संपूर्ण बिलोली, नायगाव, देगलूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> आम्ही शासनाचे नियम पाळून, रॉयल्टी भरून व्यवसाय करत आहोत. मग या तोतयांची दादागिरी का सहन करायची? पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती प्रसारण अधिकाऱ्यांनी या तोतया पत्रकारांची ओळख पटवून त्यांच्यावर तात्काळ खंडणीचे गुन्हे दाखल करावेत आणि आम्हा कायदेशीर व्यवसायधारकांना पोलीस संरक्षण व दिलासा द्यावा."
>
> **- व्यापाऱ्यांची प्रमुख मागणी**

# कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द हेच यशाचे सूत्र – ज्ञानेश्वर खुरांगे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर येथील गुलमोहर रोड परिसरातील आनंद माध्यमिक विद्यालयात दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सत्कार समारंभ संपन्न झाला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद, पालकांचा अभिमान आणि शिक्षकांच्या परिश्रमांचे सार्थक अशा भावनिक वातावरणात हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे हे होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विनोद बजाज, सचिव किसन तरटे, श्रीमती आशा सोनवणे, दिलीप अकोलकर, विश्वनाथ पोखरकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शारदा पोखरकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रविंद्र अष्टेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



यावर्षी विद्यालयातून गार्गी ढेंगेकर हिने ९८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला, तर गौरी वानखरे (९४.६० टक्के) द्वितीय आणि अवंतिका माने (९४.२० टक्के) तृतीय ठरल्या. याशिवाय सेजल बोरूडे, विराज बोडखे, प्रतिक्षा धोत्रे, श्रेया अडसूळ, रोहित दातीर, सोहम काळे, अंजली डावखर, प्रिया गळगटे, नक्षत्रा गुंदेचा आणि अभिज्ञा भोर या विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त करून विद्यालयाच्या यशपरंपरेत मानाचा तुरा खोवला.

क्रीडा क्षेत्रातही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. कबड्डीपटू ज्ञानेश्वरी ढवण हिची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच वीरा ठोंबरे, खुशी कोंडा, श्रेया अडसूळ, फौजिया शेख आणि ओम संभार यांची अनुक्रमे जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ज्ञानेश्वर खुरांगे म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण परिश्रम, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन असते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, कला आणि व्यक्तिमत्त्व विकास या क्षेत्रांतही विद्यार्थ्यांनी प्रगती साधणे ही काळाची गरज आहे. आनंद विद्यालयाने शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.

खेळ हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रभावी पाया आहे. खेळातून शिस्त, संयम, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द विकसित होते. खेळ आणि अभ्यास या एकाच नाण्याच्या दोन परस्परपूरक बाजू असून विद्यार्थ्यांनी दोन्ही क्षेत्रांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. शैक्षणिक यश महत्त्वाचे असले, तरी त्यासोबत वाचन, लेखन, संगीत, चित्रकला, वक्तृत्व, विज्ञान प्रयोग, क्रीडा आदी विविध छंद जोपासल्यास व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध आणि सक्षम बनते.

यश मिळाल्यानंतर त्याने हुरळून जाऊ नका, तसेच अपयश आले तरी खचून जाऊ नका. प्रत्येक यश हे पुढील वाटचालीची नवी जबाबदारी घेऊन येत असते. स्वतःसाठी उच्च ध्येय निश्चित करा, मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्याचा दृढ संकल्प करा. जिद्द, सातत्य, कठोर परिश्रम आणि सकारात्मक विचार यांच्या बळावर कोणतेही शिखर गाठणे अशक्य नाही. आजचा विद्यार्थी हा उद्याचा सक्षम नागरिक, संशोधक, क्रीडापटू, प्रशासकीय अधिकारी आणि राष्ट्रनिर्माता असणार आहे. त्यामुळे वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि स्वअनुशासन यांच्या आधारावर स्वतःचे भविष्य घडवा," असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. मुख्याध्यापिका श्रीमती शारदा पोखरकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)